# शिवाजी विद्यापीठात संविधान दिन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात गुरुवारी संविधान दिन आणि शहीद दिनानिमित्त भारतीय संविधानकर्ते आणि वीर शहीद जवानांच्या पवित्र स्मृतींना अभिवादन करण्यात आले. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये सकाळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते संविधानाची प्रास्ताविका, संविधानाची मूळ प्रत यांना अभिवादन करण्यात आले. प्रास्तावनेचे सामूहिक वाचन करण्यात आले.

यावेळी २६/११ च्या मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या वीरांसह अन्य शहिदांच्या प्रतिमांनाही कुलगुरू डॉ. शिर्के यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते पुष्प वाहून अभिवादन करण्यात आले. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक अभय जायभाये, डॉ. पी. एन. वासंबेकर, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. निखिल गायकवाड, डॉ. ए. एम. सरवदे, डॉ. वर्षा जाधव, डॉ. डी. बी. सुतार, डॉ. पी.बी. बिलावर, डॉ. शिवराज थोरात, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# विद्यापीठात चव्हाण यांना अभिवादन

**कोल्हापूर :** देशाचे माजी उपपंतप्रधान यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथीनिमित्त शिवाजी विद्यापीठात अभिवादन करण्यात आले. यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटमध्ये प्रतिमेचे पूजन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते झाले. महात्मा गांधी अभ्यास केंद्राच्या प्रमुख डॉ. भारती पाटील, सुधीर देसाई, उमेश गडेकर, गजानन साळुंखे, डॉ. नितीन माळी, अमोल मिणचेकर, डॉ. वैशाली भोसले उपस्थित होते.

# विषम सत्राच्या परीक्षा महाविद्यालय, अधिविभाग स्तरावर १५ डिसेंबरपासून

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने उन्हाळी सत्र २०२० मधील सर्व अभ्यासक्रमासाठी (विधी विद्याशाखा वगळून) परीक्षा शुल्क भरलेल्या (अंतिम सत्र, अंतिम वर्ष परीक्षा वगळून) पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांच्या विषम सत्राच्या परीक्षा महाविद्यालय, अधिविभाग स्तरावर १५ डिसेंबरपासून सुरू होणार आहेत. परीक्षेच्या आयोजनासाठी विद्यापीठ अधिकार मंडळांनी मान्यता दिली आहे.

परीक्षा विभागाच्या वतीने संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिविभाग प्रमुखांना परिपत्रक पाठविण्यात आले आहे. त्यानुसार १५ ते ३१ डिसेंबर या कालावधीत परीक्षा होतील. परीक्षांचे वेळापत्रक महाविद्यालय, अधिविभाग स्तरावर स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येईल. अग्रणी, समन्वयक महाविद्यालयांनी सर्व विषम सत्रांच्या परीक्षेचे वेळापत्रक अंतर्गत असलेल्या महाविद्यालयाच्या समन्वयाने तयार करून सर्व संबंधित महाविद्यालयांना पाठविण्याची कार्यवाही करावी, अशा सूचना परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी.आर.पळसे यांनी परिपत्रकात दिल्या आहेत.

# विद्यापीठाच्या पुनर्परीक्षार्थी परीक्षा १५ डिसेंबर पासून

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या अधिकार मंडळाच्या ठरावानुसार उन्हाळी २०२० मधील सर्व अभ्यासक्रमांच्या पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांच्या परीक्षा महाविद्यालय स्तरावर ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यानुसार १५ ते ३१ डिसेंबर दरम्यान या परीक्षा घ्याव्या अशा सुचनापरीक्षा विभागाच्या वतीने परीपत्रकाद्वारे दिल्या आहेत. फेब्रुवारी २०२० मध्ये घेण्यात येणाऱ्या पुर्नपरीक्षार्थी विद्यार्थ्यांच्या परीक्षा कोरोनामुळे स्थगित केल्या होत्या. विधी विद्याशाखेच्या परीक्षा वगळुन पनर्परीक्षार्थींच्या परीक्षा घेण्यात याव्यात अशा सुचना गुरुवारी विद्यापीठाच्या वतीने संबंधीत महाविद्यालयांना दिल्या आहेत.